## प्रेस नोट

ता. २५/१०/२०१७

### दुचाकी वाहन चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास गुन्हे शाखा युनिट २ कडुन जेरबंद करुन १३२ वाहनचोरी निष्पन्न करुन ६४ वाहने हस्तगत करण्यात पुणे पोलीसांना यश

पुणे शहरात वाहनचोरीच्या गुन्हयांमध्ये वाढ झाल्याने माननीय पोलीस आयुक्त, रश्मी शुक्ला, सह पोलीस आयुक्त, श्री रविंद्र कदम, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री प्रदिप देशपांडे, पोलीस उप पोलीस, गुन्हे १, श्री सुधीर हिरेमठ, सहा पोलीस आयुक्त, गुन्हे १ श्री सुरेश भोसले यांनी वाहनचोरी होणारे ठिकाणी भेट देवून सदर भागात कोणत्यावेळी कोणत्या दिवशी वाहनचोरी होत आहे याबाबत दाखल गुन्हयांचा आढावा घेवून सतर्क पेट्रोलिंग ठेवून वाहनचोरी करणारे रेकॉर्ड वरील गुन्हेगार चेक करुन वाहनचोरीच्या गुन्हयांना प्रतिबंध करावा असे आदेश दिल्याने गुन्हे शाखा, युनिट २ चे पोलीस निरीक्षक श्री सतिश निकम यांनी त्यांचे युनिट चे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे तीन पथक तयार करुन एक पथक हिंजवडी वाकड, दुसरे पथक सिंहगड वारजे व तीसरे पथक भारती विदयापीठ दत्तवाडी भागात वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही करण्याकरीता नेमण्यात आले होते.

त्यावेळी वाकड हिंजवडी पथकातील सपोफौ तांबे व पोशि जंगीलवाड असे हिंजवडी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना एक संशयीत इसम मोटारसायकल वरुन जाताना दिसला म्हणून त्यास थांबवून त्यास त्याचे नाव व पत्ता विचारता त्याने आपले नाव संतोष शिवराम घारे, वय ३३, रा. मु.पो. ओझर्डे, ता. मावळ, जि. पुणे असे सांगितले. त्यावेळी त्याचेकडे सदर मोटारसायकलचे कागदपत्रे बाबत चौकशी केली असता तो उडवा उडवीची उत्तरे देत असल्याने सदर इसमास सीआरपीसी ४१ (१)(ड) प्रमाणे ताब्यात घेवून त्याचे ताब्यात असलेल्या गाडीचे चॅसीस नं. व इंजिन नं. वरुन माहिती प्राप्त केली असता सदर मोटारसायकल बाबत हिंजवडी पोलीस स्टेशन गुरनं. ७१/२०१७, भादवि क. ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे निदर्शनास आले. त्यावरुन सदर इसम हा मोटारसायकल चोरी करणारा असल्याचे खात्री झाल्याने त्याचेकडे चौकशी केली असता त्याने सदरची गाडी चोरी केल्याची कबुली देवून पुणे शहरात शिवाजीनगर, डेक्कन, विश्रामबाग, स्वारगेट, हडपसर, निगडी, पिंपरी या पोलीस स्टेशनच्या हद्दीत वाहनचोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्याप्रमाणे सदर आरोपीस विश्वासात घेवून चोरी केलेली ठिकाणाची माहिती घेतली असता पुणे शहरात एकूण १३२ ठिकाणे वाहनचोरी केल्याचे त्याने सांगितले असून चोरीचे वाहन विक्री केलेल्या व्यक्तींची माहिती प्राप्त केली आहे. सदर वाहन खरेदी केलेल्या व्यक्तींचा शोध घेवून ६४ बजाज पल्सर, हिरो होंडा स्प्लेंडर, हिरो होंडा पॅशन, होंडा ॲक्टीवा, होंडा शाईन, बजाज डिस्कव्हर, होंडा युनिकॉर्न, बजाज बॉक्सर या कंपनींच्या गाडया हस्तगत करण्यात आलेल्या असून यांचे मालकांचा शोध घेवून दाखल गुन्हयांची माहिती घेतली असता हिंजवडी पो.स्टे. - ०६, शिवाजीनगर पो.स्टे. - ०४, विश्रामबाग पो.स्टे. - ०४, वाकड पो.स्टे. - ०३ , डेक्कन पो.स्टे. - ०२, हडपसर पो.स्टे. - ०२, निगडी पो.स्टे. - ०२ , भारती विदयापीठ पो.स्टे. - ०१ , पिंपरी पो.स्टे. - ०१ , सांगवी पो.स्टे. - ०१, पुणे ग्रामीण हद्दीतील तळेगाव दाभाडे पो.स्टे. - ०७ , कामशेत पो.स्टे. - ०३ , देहूरोड पो.स्टे. - ०१, वडगाव मावळ पो.स्टे. - ०१, खंडाळा पो.स्टे. - ०१ , उदगीर पो.स्टे. – १ असे एकूण ४० गुन्हे दाखल असल्याचे माहिती प्राप्त झालेली असून उर्वरीत दुचाकी वाहनांची माहिती प्राप्त करण्याचे काम चालू आहे.

सदर आरोपी नामे संतोष शिवराम घारे, वय ३३, रा. मु.पो. ओझर्डे, ता. मावळ, जि. पुणे यांचेवर २००३ साली वाहनचोरीचे ६ गुन्हे दाखल असून हा बिल्डींग बांधकामामध्ये सेट्रींगचे काम करुन उदरनिर्वाह करतो व पैशाची गरज लागल्यास बनावट चावीच्या आधारे दुचाकी वाहनाची चोरी करुन सदर बांधकामावर काम करणारे इतर कामगार यांना माझी पत्नी किंवा मुलगी आजारी असून पैशाची गरज आहे असे कारण सांगून ५००० ते ७५०० रुपये पर्यंत वाहनाची विक्री करुन कागदपत्रे नंतर देतो असे सांगत होता. तसेच काही दिवसांनी बांधकामाची साईट बदलून दुसऱ्या ठिकाणी

Pune Police

कामाला जावून त्याठिकाणी वरील प्रमाणेच हकीकत सांगून चोरीच्या दुचाकी वाहनांची विक्री करीत होता तसेच गावातील ओळखीच्या लोकांना सुध्दा त्याने दुचाकी विक्री केल्याचे निष्पन्न झालेले आहे.

अशा प्रकारे दुचाकी चोरी करणारा सराईत गुन्हेगार नामे संतोष शिवराम घारे, वय ३३, रा. मु.पो. ओझर्डे, ता. मावळ, जि. पुणे यास युनिट २ चे पथकाने अटक करुन त्याचे कडून एकूण १३२ ठिकाणी दुचाकी वाहन चोरी केल्याचे निष्पन्न करुन त्यापैकी २५,३०,०००/- रु किमतीची ६४ वाहने हस्तगत करुन त्यापैकी ४० गुन्हे उघडकीस आणण्यात यश आलेले असून सदर आरोपीची दि. ३०/१०/२०१७ पावेतो पोलीस कस्टडी रिमांड असून आणखीन वाहने प्राप्त होवून गुन्हे उघडकीस होतील.

सदरची कामगिरी मा. श्री प्रदिप देशपांडे अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, पोलीस उप आयुक्त, श्री सुधीर हिरेमठ, सहा पोलीस आयुक्त, श्री सुरेश भोसले यांचे मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक सतिश निकम, सपोनि अन्सार शेख, पोलीस कर्मचारी राजकुमार तांबे, सुरेश उगले, राजू केदारी, सिराज शेख, दिनेश गडांकुश, अस्लम पठाण, अजय खराडे, अनिरुध्द सावर्डे, विशाल भिलारे, अतुल गायकवाड, किशोर वग्गू, अजित फरांदे, प्रसाद जंगिलवाड, मुकंद पवार, चंद्रकांत महाजन यांनी केलेली आहे.

(सतिश बा. निकम)
पोलीस निरीक्षक
युनिट २, गुन्हे शाखा, पुणे शहर

